महावितरण (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन उपक्रम)
सीआयएन : यु४०१०९एमएच२००५एसजीसी१५३६४५

दुरध्वनी क्र. २६४७४२११ (का.)/विस्तारित क्र. २५२९
संकेतस्थळ : www.mahadiscom.in
ई - मेल : edbillingho@gmail.com

देयक व महसूल विभाग, प्लॉट क्र. जी-९, प्रकाशगड
प्रो. अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

**क्र. का.सं.(दे. व म.)/कृषीपंप देयक दुरुस्ती/** No 31725 **दिनांक :** 28 DEC 2017

## वाणिज्य परिपत्रक क्र. २९९

**विषय:** शेतकऱ्यांसाठी सुरळीत वीज पुरवठा, योग्य वीज देयक व शासन सवलतीच्या दरानुसार वीज देयक वसुली.

**संदर्भ:** १) वाणिज्य परिपत्रक क्र.२९४ दि.०१.११.२०१७.
२) वाणिज्य परिपत्रक क्र.२९५ दि.१८.११.२०१७.
३) वाणिज्य परिपत्रक क्र.२९६ दि.२४.११.२०१७.

शेतकऱ्यांना थकीत वीज बिल हप्त्याने भरण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने "मुख्यमंत्री कृषी संजीवनी योजना-२०१७" जाहीर केली आहे. सदर योजनेची अंमलबजावणी वरील संदर्भित परिपत्रकांद्वारे करण्यात येत आहे. सदर योजनेची अंमलबजावणी करताना वीज देयकांच्या दुरुस्ती संदर्भात बऱ्याच तक्रारी / निवेदने प्राप्त झाली आहेत. त्या अनुषंगाने फिडर निहाय वीज देयकांच्या दुरुस्ती शिबिराचे आयोजन करण्यासाठी वाणिज्य परिपत्रक क्र.२९६ दि.२४.११.२०१७ नुसार सूचना सर्व क्षेत्रिय कार्यालयांना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

दि.२०.१२.२०१७ रोजी लोक प्रतिनिधी समवेत झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने तसेच कृषी पंपाच्या वीज देयकांच्या दुरुस्तीकरीता देण्यात आलेल्या यापुर्वीच्या निर्देशांच्या अनुषंगाने शासनातर्फे महावितरण कंपनीला खालील सूचना प्राप्त झाल्या आहेत.

१) संबंधीत मंडळाचे अधिक्षक अभियंता यांनी त्यांच्या अखत्यारीत असलेल्या कृषीपंपाच्या वीज देयकाच्या दुरुस्तीसाठी फिडरनिहाय शिबिराचे आयोजन करण्यात यावे.

२) कृषी ग्राहक "मुख्यमंत्री कृषी संजीवनी योजना-२०१७" मध्ये भाग घेऊन रु.३०००/- किंवा रु.५०००/- भरुन सहभागी झाला असेल व वीज देयक दुरुस्तीसाठी अर्ज केला असेल तर त्याचा वीज पुरवठा या योजनेत नमुद केल्याप्रमाणे पहिल्या हप्त्याची मुदत संपेपर्यंत खंडीत करण्यात येऊ नये.

३) ज्या कृषी ग्राहकांने सवलतीच्या दराने सुध्दा रु. ३०००/- किंवा रु.५०००/- भरले नसतील अशा थकबाकीदार कृषी ग्राहकांचा वीज पुरवठा नियमानुसार खंडीत करण्यात यावा.

४) संबंधीत परिमंडळातील जनसंपर्क अधिकारी यांनी शिबीर घेण्याअगोदर शिबिराबद्दल स्थानिक वर्तमानपत्राद्वारे व्यापक प्रसिध्दी द्यावी.

५) वीज बिलाची दुरुस्ती करीत असताना ग्राहकाचा मंजुर तसेच जोडलेला विद्युत भार, मीटरवरील वाचन, फिडरवरील वीज वापराचा निर्देशांक, वापराचे तास इत्यादी बाबी स्थानिक उपविभागीय कार्यालयांनी विचारात घ्याव्यात.

६) संबंधीत विभागाचे कार्यकारी अभियंता यांनी रोहित्रावरील सर्व कृषीपंप धारकांनी थकीत वीज देयकाचा रु.३०००/ रु. ५०००/ चा भरणा केल्यास, नादुरुस्त वितरण रोहित्र अग्रक्रमाने तीन दिवसात बदलून दयावे.

७) सांघिक कार्यालयामार्फत आवश्यकतेनुसार ऑईल दिलेले असून संबंधीत मंडळाचे अधिक्षक अभियंता यांनी फिल्टर युनिट मध्ये ऑईल आणि वितरण रोहित्राचा योग्य साठा ठेऊन त्याची कमतरता भासणार नाही याची खबरदारी घ्यावी.

८) दुष्काळ व दुष्काळ सदृश भागांसाठी शासनाद्वारे जाहीर केलेल्या विविध सवलतीच्या शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी महावितरण कंपनीने सन २०१० ते आजपर्यंत वाणिज्य परिपत्रके क्र.१०९, १५९, १६२, १८४, १८९, १९७, २२७, २३३, २३५, २४४, २५३ व २६५ अन्वये वेळोवेळी वीज दरात अतिरिक्त सवलत दिली आहे. दुष्काळग्रस्त गावांसाठी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयानुसार संदर्भीत सवलतीच्या पात्र लाभार्थी गावांची यादी संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाकडून उपलब्ध करुन घेऊन सवलत देण्याची कारवाई अपेक्षित होती. ती झालेली नसल्यास संबंधित अधिक्षक अभियंता यांनी संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाकडून माहिती उपलब्ध करुन घेऊन देयकाचे दुरुस्ती / समायोजनाची कार्यवाही करावी. तसेच शासनाने दिलेल्या सवलतीचा लाभ कृषी पंपधारकास होत असल्याबाबतची खातरजमा करावी. शासनाद्वारे जाहीर सवलतीच्या लाभापासून वंचित आढळलेल्या कृषी ग्राहकास देण्यात आलेल्या सवलतीच्या रक्कमेची प्रतिपूर्ती शासनाकडे करण्यासाठीची मंडळ निहाय माहिती सांघिक कार्यालयास सादर करण्यात यावी. तसेच वीज देयक दुरुस्त करुन त्याबाबतचा सविस्तर अहवाल सांघिक कार्यालयाकडे सादर करण्यात यावा.

९) "मुख्यमंत्री कृषी संजीवनी योजना-२०१७" अंतर्गत हप्ते भरावयाचा, पहिला हप्ता (म्हणजे रु.३०००/- किंवा रु.५०००/- भरल्यानंतर पहिल्या हप्त्याची उर्वरित रक्कम) व त्यानंतरच्या सर्व हप्त्यांच्या मुळ मुदतीस तीन महिन्यांची वाढ देण्यात येत आहे. या मुदतवाढीमुळे हप्ते भरावयाचा मुळ कालावधी तीन महिन्यानी वाढविण्यात येत आहे.

१०) सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी मुख्यालयी राहून कृषीपंपाच्या वीज बिलाची दुरुस्ती तसेच वसुली व्यवस्थितपणे होईल व शेतक-यांना वीज बिल दुरुस्ती करताना कोणती अडचण येणार नाही याची दक्षता घ्यावी.

११) वरील सूचनांचे पालन होत असल्याबाबत संबंधित सह व्यवस्थापकीय संचालक / प्रादेशिक संचालक यांनी खातरजमा करावी व तसा परिशिष्ट निहाय अहवाल सांघिक कार्यालयाकडे सादर करावा.

१२) कृषीपंपाची वीज देयक दुरुस्ती व वसुलीच्या कामात दिरंगाई आढळल्यास संबंधीत अधिकारी / कर्मचारी यांच्यावर कठोर कारवाई होऊ शकते याची नोंद घ्यावी.

**कार्यकारी संचालक (देयक व महसूल)**

प्रत रवाना : प्रेषण यादीप्रमाणे.

## परिशिष्ट "अ"

| अ. क्र. | एकूण फिडर | एकूण रोहित्र | एकूण कृषी ग्राहक | घेण्यात आलेले एकूण शिबीर | प्राप्त तक्रारी | वीज बिलाबाबत तक्रारी | | | | एकूण वीज देयक दुरुस्ती | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | चुकीचे वाचन | नादुरुस्ती मिटर | जोडभार दुरुस्ती | इतर | एकूण युनिट | एकूण वजावट केलेली रक्कम रु. |
| | | | | | | | | | | | |

## परिशिष्ट "ब"

| वर्ष | जिल्हयाचे नाव | मंडळ कार्यालय | शासन सवलती पासून वंचित आढळलेले पात्र ग्राहकांची संख्या | वंचित सवलतीची रक्कम | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | युनिट | रक्कम |
| २०१० ते २०१७ | | | | | |